# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा / मुकाअ/परिपत्रक/५५६ /२०१५
दिनांक :- 9 NOV 2015

परिपत्रक क्र.- १४४ अ

विषय :- बृहन्मुंबई महानगर पालिका विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) अंतर्गत राबविणेत येणाऱ्या खाजगी जमीन मालकांसाठी झोपडपट्टी योजना दाखल करणेबाबतची सुधारित कार्यपध्दती.

संदर्भ :- या प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४४ , दि. ३१/०८/२०१३

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय व निमशासकीय जमीनीवर असलेल्या झोपडपट्टयांच्या पुर्नविकास करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३(१०) अंतर्गत प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे स्विकृत करण्यासाठी सादर केले जाणारे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रस्ताव दाखल करणेची कार्यपध्दती प्राधिकरणातील संदर्भिय परिपत्रक क्र. १४४ नुसार निश्चित करणेत आली आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु) अधिनियम १९७१ मधील कलम १३ (१) नुसार खाजगी जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेचे प्राथमिक अधिकार हे जमिन मालकांना प्रदान करणेत आले आहे. सद्याचे परिपत्रक क्र. १४४ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करते वेळी विकासकाने त्यांना ७०% झोपडीधारकांची संमती असलेबाबतच्या सर्वसाधारण सभेचा ठराव दाखल करणे,परिशिष्ट -५ प्रमाणे आवश्यक केले आहे. परंतु झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्याचा प्रथम अधिकार जमीन मालकाचा असल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करतेवेळी जमीन मालकांसाठी या प्राधिकरणातील परिपत्रक क्र. १४४ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करणेत येत आहे.

१. ज्या खाजगी जमीनीवर झोपडपट्टी वसलेली आहे व जी खाजगी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित होण्यासाठी किंवा जेथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्रस्ताव अपेक्षित आहे, अशा खाजगी जमिनीच्या मालकास महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ अंतर्गत असलेला पुनर्वसनेचा अधिकार बजावण्याची इच्छा असेल आणि सदर कायदेशीर अधिकारानुसार त्या संदर्भात या प्राधिकरणासाठी केलेले परिपत्रक क्र. १४४ अन्वये पुनर्वसन योजनेचा ते प्रस्ताव दाखल करीत असतील, अशा वेळी प्रस्ताव स्विकारण्यापूर्वी परिपत्रक क्र. १४४ मध्ये

आवक क्र. 2954
दिनांक 9 NOV 2015

आवश्यक असलेले परिशिष्ट -५ ची अट शिथिल करणेत येईल. सदर प्रस्तावासोबत मसुदा परिशिष्ट -२ मध्ये केवळ प्रस्तावित पुनर्वसन योजनेतील झोपडपट्टी क्षेत्राच्या सीमा नमूद असाव्यात

२. सबंधित खाजगी जमीन मालकांनी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावासोबत सर्वेक्षण व झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी संभाव्य खर्च म्हणून प्रति हेक्टर रु. १० लाख प्रमाणे होणारी रक्कम डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर स्वरुपात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण येथे जमा करावे.

३. सदर योजनेतील झोपडीधारकांची पात्रता निश्चित झाल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमानुसार विकासकास झोपडीधारकांची आवश्यक असलेली संमती तपासली जाईल.

वरील प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत खाजगी जमिनीवरीलचा प्रस्ताव स्विकारण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे. याप्रमाणे सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी. यापूर्वी. दि. ३१/०८/२०१३ रोजी निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. १४४ मध्ये या नुसार बदल करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत :- सर्व विभाग प्रमुख / झोपुप्रा.